# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

## <u>परिपत्रक</u>

## <u>२०२३-२०२४</u>

क्रमांक: प्रले/एफडीटी/०८ दि.१४.०९.२०२३

**विषय**:- सन २०२३-२४ चे सुधारित अंदाज व सन २०२४-२५ चे अर्थसंकल्पीय अंदाज 'अ' (फंड कोड - ११, १२, ६०, ७०), 'ब' (फंड कोड - २१, २२, २३) आणि 'ई' (फंड कोड - ३०) विषयक महसुली उत्पन्न व खर्च / भांडवली (प्रकल्प) उत्पन्न व खर्चाचे प्रस्ताव आयुक्त स्तरावर सादर करण्याबाबत

**संदर्भ**:- परिपत्रक क्रमांक : प्रले/एफडीटी/११ दि.३०.०९.२०२२

---

सन २००७-०८ या आर्थिक वर्षापासून अर्थसंकल्पीय अंदाज प्रामुख्याने निधी (Fund) व महानगरपालिकेतर्फे पार पाडण्यात येणारी कार्ये (Functions) यावर आधारित असून मुख्य कार्यालय (Head Office), विभाग - एक, दोन आणि तीन (Div.- I, II and III), परिमंडळ एक ते सात (Zone - I to VII), विभाग (Wards) आणि स्थानिय घटक / शाखा (Location Unit) अशा Cost / Profit Centre नुसार तयार करण्याची सुधारित अर्थसंकल्पीय कार्यप्रणाली अवलंबिण्यात आली आहे. त्यामुळे, प्रत्येक खात्याचे सन २००७-०८ पासूनचे अर्थसंकल्पीय अंदाज त्यांच्या कॉस्ट सेंटरनिहाय SAP या कार्यप्रणालीमध्ये नॅशनल म्युनिसिपल अकौंटिंग मॅन्युअल (NMAM) च्या तत्त्वांनुसार तयार करण्यात आलेल्या सर्व लेखाशीर्षांच्या संहितीकरणाप्रमाणे (Uniform Codification) उपलब्ध आहेत.

२. सर्व संबंधित सहाय्यक आयुक्त / खाते प्रमुख यांनी त्यांच्या खात्याचे सन २०२४-२५ करीताचे महसुली/ भांडवली (प्रकल्प कामे) अर्थसंकल्पीय अंदाजांचे प्रस्ताव तयार करुन महानगरपालिका आयुक्त स्तरावर सादर करावयाच्या कार्यप्रणालीबाबतच्या सूचना खालीलप्रमाणे आहेत.

(i) अर्थसंकल्पीय अंदाजांचे प्रस्ताव फंडनिहाय (Fundwise), फंक्शननिहाय (Functionwise) तसेच Cost/ Profit Centre नुसार तयार करावेत व संबंधित सहाय्यक आयुक्त / खाते प्रमुख यांनी त्यांच्या खात्याच्या <u>सर्व Cost / Profit Centre चे प्रस्ताव एकत्रित करुन (Summary) संबंधित प्रमुख लेखापालांच्या अर्थसंकल्प उपविभागाकडे पुढील परिच्छेद ५ मध्ये नमूद केलेल्या वेळापत्रकानुसार एकत्रितपणे (Consolidated) सादर करावेत</u>. असे अर्थसंकल्पीय प्रस्ताव तयार करताना आवश्यकता भासल्यास सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय अंदाजाबाबतचा पेनड्राईव्ह / महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर 'नकाशे, अंतरंग आणि अहवाल - प्रकट माहिती - अर्थसंकल्प - Budget Estimate 2023-2024' या टॅब अंतर्गत Upload केलेली अर्थसंकल्पीय अंदाजाची पुस्तके संदर्भित करावीत.

(ii) या पूर्वी एकाच खात्याचे शहर, पश्चिम उपनगरे व पूर्व उपनगरे असे तीन वेगवेगळे प्रस्ताव सादर करण्यात येत होते, उदा. उपप्रमुख अभियंता रस्ते (शहर), उपप्रमुख अभियंता रस्ते (पश्चिम उपनगरे) आणि उपप्रमुख अभियंता रस्ते (पूर्व उपनगरे). नवीन कार्यप्रणालीनुसार प्रत्येक खात्याला स्वतंत्र कोड देण्यात आला असून त्यांनी त्यांच्या खात्याचा एकच एकत्रित प्रस्ताव फंक्शन एरियानुसार, कॉस्ट सेंटरनुसार खाते प्रमुखांच्या स्वाक्षरीने सादर करावा.

(iii) सन २०२३-२४ चे सुधारित व सन २०२४-२५ चे अर्थसंकल्पीय अंदाज सादर करताना सहाय्यक आयुक्त/खाते प्रमुखांनी मान.महानगरपालिका आयुक्त यांच्या सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय अंदाजाच्या पुस्तिकेमध्ये (M.C.'s Book on Budget) उल्लेख केलेल्या विविध योजनांचा अभ्यास करुन सदर योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या / करावयाच्या कामांकरीता / खर्चाकरीता योग्य त्या लेखा संकेतांकांतर्गत आवश्यक ती तरतूद करण्यात यावी.

(iv) सहाय्यक आयुक्त / खाते प्रमुख यांना अशी सूचना करण्यात येते की, आगामी वर्षात अर्थसंकल्पात समाविष्ट करावयाची नवीन कामे ही खात्यांच्या उद्दीष्टांनुसार अत्यंत महत्वाची असली पाहिजेत. ही बाब लक्षात घेऊन खाते प्रमुखांनी अर्थसंकल्पात प्रस्तावावयाच्या नवीन कामांपैकी अग्रक्रमाने हाती घ्यावयाची कामे, कामांच्या प्राधान्यानुसार (i.e. Priority-I, Priority-II, Priority-III, etc.) नमूद करावीत.

(v) अर्थसंकल्पात समाविष्ट करावयाच्या नवीन महसूली व भांडवली कामांची एकूण अंदाजित किंमत प्रस्तावांमध्ये नमूद करणे तसेच अशा नवीन प्रस्तावांना संबंधित मान.उप आयुक्त व मान.अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त यांची प्रशासकीय मंजुरी प्राप्त करून सदर मंजुरीची कागदपत्रे अर्थसंकल्पीय अंदाजाच्या प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

(vi) आगामी वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये प्रकल्प कामांसाठी प्रस्ताविण्यात येणाऱ्या ठोक तरतुदीअंतर्गत (Lumpsum Provision) चालू वर्षातील (सन २०२३-२४) प्रगतीपथावरील कामांसाठी (Ongoing works) व आगामी वर्षात (सन २०२४-२५) हाती घ्यावयाच्या नवीन कामांकरीता अनु क्र.४ भांडवली प्राप्ती आणि भांडवली खर्च यामधील मुद्दा क्र.(xiv) प्रमाणे तरतूद प्रस्ताविण्यात यावी व त्याबाबतचा बाबनिहाय तपशील (कामांची यादी) कामांच्या प्राधान्यानुसार प्रस्तावासोबत देण्यात यावा.

(vii) चालू आर्थिक वर्षात पुनर्वाटपाद्वारे / स्थानांतरणाद्वारे / आकस्मिकता निधीमधून उपलब्ध करून दिलेल्या तरतुदींचा समावेश सन २०२३-२४ चे सुधारित अंदाज सादर करताना करावा.

(viii) अर्थसंकल्पीय अंदाजात महिला व मुले यांना केंद्रस्थानी ठेवून केलेल्या तरतूदी 'जेंडर बजेट' खाली स्वतंत्रपणे दर्शविण्यात येतात. याच धर्तीवर, सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजातील महिलाकेंद्रित तरतूदी 'जेंडर बजेट' अंतर्गत स्वतंत्रपणे दर्शविण्यात येणार असल्याने महिलांच्या विकासासाठी शिक्षण, आरोग्य व व्यवसायशिक्षण या क्षेत्रातील राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांसाठी सन २०२४-२५ मध्ये करावयाच्या तरतूदी स्वतंत्रपणे दर्शविण्यात याव्यात.

त्याचप्रमाणे महिला सक्षमीकरणासाठी महानगरपालिकेच्या बंधनकारक व स्वविवेकाधीन कर्तव्यांच्या मर्यादेत राहून महिलांकरीता एखादी नवीन योजना राबवावयाची / अंमलात आणावयाची असेल तर त्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्यांची मंजुरी घेऊन सदर योजनेसाठी तरतूद प्रस्ताविण्यासाठी यथोचित अर्थसंकल्पीय प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. तसेच असे अर्थसंकल्पीय प्रस्ताव सहाय्यक आयुक्त (नियोजन) यांच्यामार्फत सादर करणे आवश्यक आहे.

(ix) केंद्र शासनाने दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणासाठी दिव्यांग व्यक्तींसाठी समान संधी संरक्षण व समान सहभाग कायदा, १९९५ दि.०१.०१.१९९६ पासून लागू केला आहे. सदर कायद्यातील कलम ४० अन्वये शासन परिपत्रक क्र.दिव्यांग२०१८/प्र.क्र./५२/२०१८/नवि-२८ दि.१० मे, २०१८ मधील तरतुदीनुसार सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांनी आपल्या अर्थसंकल्पात दारिद्रय निर्मूलन कार्यक्रमांतर्गत दिव्यांगासाठी किमान ५ टक्के निधी राखीव ठेवण्याबाबत तात्काळ कार्यवाही करावी असे निर्देश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने खात्याने तरतूदी प्रस्तावाव्यात.

शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.४३/१६/नवि-२८ दि.१४.११.२०१७ अन्वये असे निर्देश देण्यात आले आहेत की, ''दिव्यांगांसाठी राखून ठेवण्यात आलेला ५ टक्के निधी इतर प्रयोजनार्थ न वळविता नागरी भागातील दिव्यांगांसाठीच खर्च करणे अनिवार्य राहील. सदर निधीचे पुनर्विनियोजन करता येणार नाही व सदर निधी रद्द ही करता येणार नाही. म्हणजेच ज्या वर्षासाठी निधी राखीव ठेवला तो त्याच वर्षात उपरोक्त नमूद प्रयोजनासाठी खर्च करणे आवश्यक राहील.'' तद्अनुषंगाने संबंधित खात्याने योग्य ती खबरदारी घ्यावी.

तसेच शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१५/प्रक्र/११८/नवि-२० मंत्रालय दि.२८ ऑक्टोबर, २०१५ अन्वये दिव्यांग व्यक्तींसाठी राखीव ठेवण्यात आलेला निधी नागरी भागातील दिव्यांगांसाठी खर्च करण्याकरीता मार्गदर्शक सूचना प्रसृत केल्या आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक - २०१५१०२८१७०५२७१७२५ असा आहे. तसेच त्याची प्रत अर्थसंकल्प उपविभागात देखील उपलब्ध आहे. सर्व खाते प्रमुखांनी / सहाय्यक आयुक्तांनी सदर शासन निर्णयाच्या प्रतीचे अवलोकन करुन त्यांच्याशी संबंधित बाबींकरीता अर्थसंकल्पीय तरतूद करण्यासाठी सहाय्यक आयुक्त (नियोजन) यांच्याकडे प्रस्ताव सादर करावा. सहाय्यक आयुक्त (नियोजन) यांनी त्यानुसार सदर बाबींसाठी त्यांच्या खात्यांतर्गत दारिद्रय निर्मूलन कार्यक्रमांतर्गत नवीन लेखाशिर्ष निर्माण करून त्यामध्ये विशिष्ट तरतूदी प्रस्ताविण्याची दक्षता घ्यावी.

महानगरपालिकेत नियुक्त झालेल्या / होणाऱ्या अंध / क्षीणदृष्टी कर्मचाऱ्यांना शासनाच्या निदेशानुसार सहाय्यक तंत्रज्ञान / उपकरणे उपलब्ध करून द्यावयाची आहेत व यासाठी होणाऱ्या खर्चाची तरतूद अर्थसंकल्पात स्वतंत्रपणे करावयाची आहे. त्याअनुषंगाने संबंधित खाते / विभाग प्रमुखांनी / सहाय्यक आयुक्तांनी त्यांच्या आस्थापनेवर कार्यरत दिव्यांग कर्मचाऱ्यांना उपलब्ध करून द्यावयाच्या उपकरणासाठीची तरतूद त्यांच्या खात्याच्या आगामी अर्थसंकल्पात शासनाच्या निदेशानुसार स्वतंत्र शिर्षाखाली करणे आवश्यक आहे.

(x) **स्वच्छ हवा कृती योजनेच्या समन्वित आणि सर्वांगिण अंमलबजावणीच्या अनुषंगाने (To implement coordinated and holistic clean air actions) बृहन्मुंबई महानगरपालिकेने हवामान अर्थसंकल्पाचा पथदर्शक प्रकल्प हाती घेतला आहे. याकरीता सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात ग्रीन बजेटींग प्रक्रिया सुरु करणे आवश्यक आहे. तद्अनुषंगाने, सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये स्वच्छ हवा कृती योजने संबंधित तरतूदी 'ग्रीन बजेट' अंतर्गत स्वतंत्रपणे दर्शविण्यात येणार असल्याने सन २०२४-२५ मध्ये करावयाच्या तरतूदी स्वतंत्रपणे दर्शविण्यात याव्यात.**

**महसूली खर्चा संबंधीच्या तरतूदींबाबत Annexure-B-I मधील रकाना क्र.१६, १७ तसेच भांडवली खर्चा संबंधीच्या तरतूदींबाबत ANNEXURE-I मधील रकाना क्र.२८, २९ व ANNEXURE-II मधील रकाना क्र.२२, २३ मध्ये संबंधित लेखा संकेतांकासमोर कामाच्या स्वरुपानुसार MCAP Action Track Number नमूद करण्यात यावा.**

**MCAP Action Track Plan बाबतचा मार्गदर्शक तक्ता माहितीकरीता या परिपत्रकामध्ये ANNEXURE-III सोबत जोडण्यात आलेला आहे.**

**त्याचप्रमाणे स्वच्छ हवा कृती योजनेसाठी तरतूद प्रस्ताविण्यासाठी यथोचित अर्थसंकल्पीय प्रस्ताव संबंधित खात्यांकडून सादर करणे आवश्यक आहे. तसेच, याबाबत अधिक माहितीकरीता उप आयुक्त (पर्यावरण) यांचे कार्यालय यांच्याशी संपर्क साधावा.**

३. **महसूली उत्पन्न आणि महसूली खर्च**

(i) **महसुली उत्पन्नाचे प्रस्ताव सादर करताना सर्व खात्यांनी त्यांच्या अखत्यारितील लेखाशिर्षामध्ये जमा करण्यात येणाऱ्या शुल्क/आकार इत्यादीबाबतीत शेवटची सुधारणा (Last Revision) कधी करण्यात आली आहे त्याचा दिनांक नमूद करणे आवश्यक आहे. तसेच सर्व खात्यांनी त्यांच्या खात्यामार्फत वसूल करण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या शुल्क/आकार इत्यादीबाबतची परिपत्रके/अनुसूची देखील सोबत जोडणे आवश्यक आहे.**

(ii) असे निदर्शनास आले आहे की, काही खात्यांच्या बाबतीत सन २०२३-२४ करिता महसुली खर्चासाठी उदा.आस्थापना खर्च, प्रशासकीय खर्च अंतर्गत टपाल खर्च, दूरध्वनी, वीज देयके इत्यादी, प्रचलन व परिरक्षण खर्च अंतर्गत सर्वसाधारण दुरुस्त्या, मेडीसीन, ड्रग्ज इत्यादीसाठी केलेली तरतूद अपुरी पडल्यामुळे तरतुदीच्या पुनर्वाटपाचे / निधी स्थानांतरणाचे / आकस्मिकता निधीचे प्रस्ताव त्यांना सादर करावे लागत आहेत. अतएव, सन २०२४-२५ करिता अशा बाबींसाठी तरतूद प्रस्तावितानादिनांक ३० सप्टेंबर, २०२३ पर्यंत झालेला प्रत्यक्ष खर्च (यामध्ये पुनर्वाटप / निधी स्थानांतरण / आकस्मिकता निधी या पध्दतीने केलेला खर्चही अंतर्भूत करावा) विचारात घ्यावा. जेणेकरुन, आगामी वर्षात निधीच्या पुनर्वाटपासाठी/स्थानांतरणासाठी/आकस्मिकता निधीतून तरतूद उपलब्ध करून देण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याची आवश्यकता भासणार नाही.

(iii) महसुली अर्थसंकल्पीय अंदाजाच्या प्रस्तावाची छाननी करतेवेळी असे निदर्शनास येते की, अर्थसंकल्पीय तरतूद प्रस्तावितांना ज्या कारणांसाठी / कामांसाठी तरतूद प्रस्ताविण्यात येते, त्या कामांच्या / सेवेच्या / वस्तू खरेदी इत्यादींच्या बाबतीत आवश्यकतेनुसार योग्य ते परिगणन न करता ढोबळपणे अर्थसंकल्पीय अंदाजाच्या तरतुदी प्रस्ताविण्यात येतात. ही बाब आर्थिक शिस्तीच्या दृष्टीकोनातून योग्य नाही. तरी ज्या कामांच्या/ सेवेच्या / वस्तू खरेदी इत्यादींच्या बाबतीत अर्थसंकल्पात तरतुदी प्रस्ताविण्यात येणार आहेत त्या प्रस्तावितांना सर्व बाबींची शहानिशा करून येणाऱ्या एकूण खर्चाची अचूक परिगणना करून आवश्यक तेवढीच अर्थसंकल्पीय तरतूद प्रस्ताविण्यात यावी. (उदा.२२०८००४०० (उपयोजित बाह्य सेवांवरील खर्च) - बाह्यसेवेसाठी लागणारे कर्मचारी / कामगार यांची संख्या × सेवेचा कालावधी × सेवेचा दर इत्यादी.)

(iv) शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१७/प्र.क्र.(२०८/१७) सहा. दि.१७.११.२०१७ या अन्वये खालीलप्रमाणे सुचित केले आहे की, 'जन माहिती अधिकाऱ्याने, माहिती अर्ज प्राप्त झाल्यानंतर, १० व्या दिवसापर्यंत माहितीच्या शुल्काची रक्कम अर्जदारास टपाल पृष्ठसंख्या व टपालखर्चासह, जलदगती टपालाने तपशीलवार कळवावी. तसेच सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी त्यांच्या कार्यालयातील माहिती अधिकाराशी संबंधीत पत्रव्यवहाराचा तपशीलवार आढावा घेऊन माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत होणाऱ्या पत्रव्यवहारासाठी दरवर्षी आवश्यक आर्थिक तरतूद करावी'. त्यानुसार महसूली अर्थसंकल्पात सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये नवीन लेखा संकेतांक २२०८००८०१ (Expenses on account of Right to Information Act) तयार करण्यात आला असून सदर लेखा संकेतांकाअंतर्गत सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात आवश्यक ती तरतूद करण्यात यावी.

(v) महानगरपालिका मुद्रणालय, प्रतिरुप मुद्रणालय, महानगरपालिका विद्युत धुलाई केंद्र, महानगरपालिका कार्यशाळा, महानगरपालिका ओतशाळा, कार्यकारी अभियंता (परिवहन), जनसंपर्क अधिकारी, मटेरियल

टेस्टींग लॅब, अस्फाल्ट प्लॅन्ट इत्यादींमार्फत पुरविल्या जाणाऱ्या खात्यांतर्गत सेवांसाठी सन २०२४-२५ चे प्रस्ताव संबंधित खात्यांनी तयार करताना सर्व उपयोगकर्त्या खात्यांना सेवा पुरविण्यासाठी लागणाऱ्या खर्चाची पुरेशी तरतूद प्रस्तावावी. अतएव, उपयोगकर्त्या खात्यांनी अशा खात्यांतर्गत सेवांच्या खर्चासाठी त्यांच्या खात्याखाली स्वतंत्र तरतूद प्रस्ताविण्याची आवश्यकता नाही परंतु त्यांना आगामी वर्षभरात लागणाऱ्या सेवांची माहिती खात्यांतर्गत सेवा पुरविणाऱ्या संबंधित खात्यांना सादर करणे आवश्यक आहे.

यासाठी वर्ष २०२१-२२ व २०२२-२३ मध्ये खात्यांतर्गत सेवा पुरविणाऱ्या खात्यांकडून महानगरपालिकेतील ज्या ज्या खात्यांना सेवा पुरविण्यात आल्या त्यांचा संपूर्ण सविस्तर तपशील सेवेच्या खर्चासह सादर करावा. त्याचबरोबर, चालूवर्षी म्हणजेच २०२३-२४ मध्ये एप्रिल २०२३ ते सप्टेंबर २०२३ पर्यंत कोणकोणत्या खात्यांना सेवा पुरविण्यात आल्या व त्यांचा खर्च खात्यांतर्गत सेवा पुरविणाऱ्या खात्यांनी सादर करणे बंधनकारक राहिल. या खर्चाच्या आधारे सन २०२४-२५ मध्ये खात्यांतर्गत सेवा पुरविणाऱ्या खात्यांना खर्चासाठी तरतूद उपलब्ध करुन देण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

(vi) Material Management Module अंतर्गत खरेदी करावयाच्या वस्तुंसाठी संबंधित लेखाशिर्षामध्ये पुरेशी तरतूद करण्यात यावी असे स्पष्ट निर्देश मागील काही वर्षापासून देण्यात येत आहेत. तरीदेखील अनेक खात्यांकडून याबाबतची दक्षता न घेण्यात आल्यामुळे पुनर्वाटपाचे प्रस्ताव सादर करण्यात येतात हे आर्थिक शिस्तीच्या दृष्टीकोनातून योग्य नाही. तसेच यामुळे विनाकारण प्रशासकीय कामात वाढ होते व वेळेचा अपव्यय होतो.

सदर परिस्थितीचा विचार करता, सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये भांडारासाठी खरेदी करावयाच्या विविध वस्तुंसाठी तरतूद प्रस्तावताना परिपत्रक क्र.प्रले(वि)/एफएआर/२ दि.१०.०४.२०१२ मधील मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे अवलोकन करावे तसेच Material Management Module अंतर्गत त्यांच्या खात्याशी संबंधित लेखाशिर्षांची संचालक (माहिती व तंत्रज्ञान) खात्याकडून खातरजमा करावी आणि सन २०२२-२३ मध्ये करण्यात आलेल्या विविध वस्तुंच्या खरेदीपोटी करण्यात आलेल्या खर्चाचा आढावा घेऊन त्याप्रमाणे योग्य त्या लेखा संकेतांकांतर्गत तरतुदी प्रस्ताविण्यात याव्यात. त्यामुळे आगामी वर्षी पुनर्वाटपाद्वारे निधी उपलब्ध करुन देण्याची गरज भासणार नाही. सर्व खाते प्रमुखांनी / सहाय्यक आयुक्तांनी या सुचनेचे काटेकोरपणे पालन करावे.

(vii) महसुली स्वरुपाच्या दैनंदिन खर्चासाठी अर्थसंकल्प 'अ'(फंड कोड - ११, १२, ६०, ७०), 'ब'(फंड कोड - २१, २२, २३) व 'ई'(फंड कोड - ३०) च्या बाबतीत सन २०२३-२४ करीता आयुक्तांनी प्रशासक (स्थायी समिती) यांना सादर केलेल्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये उपलब्ध केलेल्या निधी एवढाच निधी सन २०२४-२५ या वर्षासाठी उपलब्ध असेल असे गृहित धरुन महसुली खर्चाचे प्रस्ताव सादर करावेत. मात्र, अपवादात्मक परिस्थितीत वाढीव तरतूद आवश्यक असल्यास त्याबाबतचे समर्थन व स्पष्टीकरण स्वतंत्र प्रस्तावात नमूद करुन त्यास संबंधित मान.अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त/मान.महानगरपालिका आयुक्त यांची प्रशासकीय मंजुरी प्राप्त करुन सदर प्रस्ताव विहित वेळेत प्रमुख लेखापाल (वित्त) खात्याच्या अर्थसंकल्प उपविभागास सादर करावेत. त्यानंतर सादर केलेले प्रस्ताव अर्थसंकल्पीय तरतुदींच्या दृष्टीकोनातून विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

(viii) नॅशनल म्युनिसिपल अकौंटींग मॅन्युअलमधील (NMAM) मार्गदर्शक तत्त्वांनुसार जी कामे 'असेट्स' निर्माण (Assets Creation) करत नाहीत त्यांचा अंतर्भाव प्रकल्प कामाखाली करता येत नाही. अतएव, अशी कामे आता महसुली अर्थसंकल्पांतर्गत प्रस्ताविण्यात यावीत. तसेच किरकोळ दुरुस्त्या व परिरक्षणाच्या कामासाठीदेखील प्रकल्प कामांतर्गत तरतूद न प्रस्ताविता महसुली अर्थसंकल्पात प्रस्ताविण्यात यावी.

(ix) ज्या खात्यांनी संगणक, प्रिंटर, प्रोजेक्टर, फॅक्स इत्यादी खरेदी केलेल्या बाबींकरीता तसेच आगामी वर्षात खरेदी करण्यात येणाऱ्या संगणक, प्रिंटर, प्रोजेक्टर, फॅक्स इत्यादींसाठी लागणाऱ्या काट्रिजेसकरीता महसुली अर्थसंकल्पांतर्गत संबंधित लेखाशिर्षामध्ये पुरेशी तरतूद प्रस्ताविण्याची दक्षता घेण्यात यावी.

(x) मालमत्ता कर/अकृषिकर आणि इतर निर्धारित करांच्या थकबाकीच्या अधिदानाकरीता अतिरिक्त तरतूद उपलब्ध करून देण्याचे प्रस्ताव मागील काही वर्षांपासून वर्षअखेरीस प्राप्त होत असून, अकृषि कर आणि इतर निर्धारित करांच्या अधिदानाकरीता मोठया प्रमाणात पुनर्वाटपाद्वारे/आकस्मिकता निधीमधून तरतूद उपलब्ध करून द्यावी लागत आहे. त्यामुळे सन २०२४-२५ मध्ये मालमत्ता कर/अकृषि कर आणि इतर निर्धारित करांच्या अधिदानासाठी तरतुदी प्रस्ताविताना सर्व खात्यांनी करनिर्धारण व संकलन खात्याशी तसेच शासनाच्या संबंधित कार्यालयांशी संपर्क साधून त्यांच्या अखत्यारीतील सर्व करांच्या थकबाकीचे तसेच सन २०२४-२५ मधील मालमत्ता कर/अकृषि कर आणि इतर निर्धारित करांचे परिगणन करून योग्य त्या लेखाशिर्षांतर्गत पुरेशी तरतूद प्रस्ताविण्याची दक्षता घ्यावी. सन २०२४-२५ मध्ये मालमत्ता कर/अकृषि कर आणि इतर निर्धारित करांच्या थकबाकीसाठी कोणत्याही परिस्थितीत आकस्मिकता निधीमधून अतिरिक्त तरतूद उपलब्ध करून देण्यात येणार नाही याची नोंद सर्व खाते प्रमुखांनी घ्यावी. तसेच काही प्रकरणी सदर कामासाठी आवश्यकतेपेक्षा भरपुर जास्त प्रमाणात तरतूद करुन नंतर त्यातून पुनर्वाटप करण्याचे प्रस्ताव सादर केले जातात ही बाब सुद्धा अर्थसंकल्पीय शिस्तीला धरुन नाही.

४. **भांडवली प्राप्ती आणि भांडवली खर्च**

(i) जी प्रकल्प कामे अनुदाने व कर्जे यातून करण्यात येत/येणार असतील त्या कामांच्याबाबतीत अभिप्रायाच्या रकान्यात ती कोणत्या अनुदानातून/कर्जातून करण्यात येत/येणार आहेत, याबाबत अभिप्राय देण्यात यावेत. तसेच एकूण अर्थसंकल्पीय तरतुदीपैकी किती टक्के अनुदाने/कर्जे आहेत याचा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

(ii) सन २०२३-२४ चे सुधारित अंदाज व सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजाचे भांडवली खर्चाचे प्रस्ताव सादर करताना खात्याने खर्च करण्याची क्षमता, मागील ३ आर्थिक वर्षांच्या तसेच चालू वर्षाच्या सहामाहीच्या प्रत्यक्ष खर्चाचा आढावा घेऊन तद्नुसार अर्थसंकल्पीय तरतुदी प्रस्ताविण्यात याव्यात.

(iii) प्रकल्प कामांचे प्रस्ताव तयार करताना भांडवली अर्थसंकल्प 'अ' (फंड कोड - ११, १२, ६०, ७०), 'ब' (फंड कोड - २१, २२, २३) व 'ई' (फंड कोड - ३०) च्या बाबतीत अपवादात्मक परिस्थितीत वाढीव तरतूद आवश्यक असल्यास त्याबाबतचे समर्थन व स्पष्टीकरण स्वतंत्र प्रस्तावात नमूद करुन त्यास संबंधित मान.अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त / मान.महानगरपालिका आयुक्त यांची प्रशासकीय मंजुरी प्राप्त करुन सदर प्रस्ताव विहित वेळेत प्रमुख लेखापाल (वित्त) खात्याच्या अर्थसंकल्प उपविभागास सादर करावेत. त्यानंतर सादर केलेले प्रस्ताव अर्थसंकल्पीय तरतुदींच्या दृष्टीकोनातून विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

तसेच, अर्थसंकल्प 'अ' (फंड कोड - ११, १२, ६०, ७०), 'ब' (फंड कोड - २१, २२, २३) आणि 'ई' (फंड कोड - ३०) च्या प्रगतीपथावरील प्रकल्प कामांकरीता सोबतचे नमुना परिशिष्ट क्रमांक १ (ANNEXURE-I) आणि नवीन प्रकल्प कामांकरीता नमुना परिशिष्ट क्रमांक २ (ANNEXURE-II) लक्षात घ्यावीत. या संदर्भात असे निदर्शनास आले आहे की, सदर प्रपत्रातील प्रकल्प कामांच्या नियोजनाबाबतचा तपशील बहुतांशी खात्यांकडून पूर्णपणे भरला जात नाही. तरी याबाबतचा तपशील (परिशिष्ट क्र.१ रकाना क्र.२३ ते २७ आणि परिशिष्ट क्र.२ रकाना क्र.१७ ते २१ सह) पूर्णपणे नमूद करावा.

(iv) प्रचलित पध्दतीनुसार प्रगतीपथावर असलेली कामे तसेच नवीन कामे यांचे प्रस्ताव प्रभाग समितींच्या शिफारशीसाठी सादर केले जातात. प्रगतीपथावरील कामांसाठी पूर्वीच प्रभाग समितीच्या शिफारशी घेतल्या असल्याने व ही कामे स्थायी समिती / महानगरपालिकेच्या मंजूरीनंतरच सुरु केली जात असल्याने प्रगतीपथावरील कामांच्या बाबतीत पुन्हा किंवा दरवर्षी प्रभाग समितीची शिफारस घेणे आवश्यक नाही. अतएव, फक्त नवीन कामाचे प्रस्ताव प्रभाग समितीच्या शिफारशीसाठी पाठविण्यात यावेत.

भांडवली खर्चांच्या कामांबाबत मान.महानगरपालिका आयुक्तांनी परिपत्रक क्र.CA(F)/Exp/१३ दि.११.०७.२०१९ अन्वये खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत –

(i) In the ensuing year's budget, the proposals for lumpsum provision for capital works is to be submitted by considering the provision for current year ongoing works and provision proposed for new works in ensuing year with their work-list alongwith their work preferences.

(ii) Each and every work should have distinct estimated cost and distinct budget provision. For creating separate G.L. Codes, the Central Agency department may club expenditure of all works of their department in the ward and propose total budget provision for their works in the Ward. HoD's of Central Agency should take cognizance of this instructions while submitting such proposal to Ward Committee.

सदर आदेशांचे काटेकोरपणे पालन करून सन २०२४-२५ चे अर्थसंकल्पीय प्रस्ताव सादर करावेत.

**तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूका पार न पडल्यामुळे सद्यस्थितीत प्रभाग समित्या अस्तित्वात नाहीत. त्यामुळे नवीन कामांच्या प्रस्तावांच्या शिफारशीबाबत दि.६ ऑक्टोबर, २०२३ पर्यंत सार्वत्रिक निवडणूका झाल्यास व प्रभाग समिती अस्तित्वात असल्यास सदर नवीन कामांचे प्रस्ताव प्रचलित पद्धतीनुसार प्रभाग समितीच्या शिफारशीसाठी पाठविण्यात यावेत. अन्यथा, प्रभाग समिती अस्तित्वात नसल्यास सदर प्रस्ताव प्रमुख लेखापाल (वित्त) खात्यातील अर्थसंकल्प उपविभागाकडे परस्पर पाठविण्यात यावेत.**

(v) महानगरपालिकेचे अर्थसंकल्पीय अंदाज अंतिम करण्याकरीता विविध प्रकल्प कामांच्या दायित्वाची स्थिती काढणे आवश्यक आहे. तद्अनुषंगाने पूर्ण झालेल्या कामांचे, चालू असलेल्या कामांचे व भविष्यात नवीन प्रकल्पांच्या दायित्वाचा तक्ता परिशिष्ठ III (परिशिष्ठ III A ते E सह) नुसार भरावा. सदर माहिती भरताना प्रत्येक लेखा संकेतांक मधील प्रत्येक कामाच्या तपशिलासह माहिती भरून सादर करावे.

त्यानुसार योग्य ती खबरदारी घेऊन सर्व खाते प्रमुखांनी सदर आदेशांचे / सुचनांचे पालन करुन खर्च कमी करण्याच्या दृष्टीने आढावा घेऊन अर्थसंकल्पीय प्रस्ताव प्रमुख लेखापाल (वित्त) खात्याच्या अर्थसंकल्प उपविभागास सादर करण्यात यावा.

(vi) सन २०२३-२४ चे सुधारित अंदाज व सन २०२४-२५ चे भांडवली कामाचे अर्थसंकल्पीय प्रस्ताव सादर करताना ज्या कामांचे कार्यादेश देण्यात आलेले आहेत अशी कामे व प्रगतीपथावर असलेली कामे यांचा प्राधान्याने विचार करून त्यानुसार भांडवली खर्चासाठी तरतूद प्रस्ताविण्याची दक्षता सर्व खात्यांनी घेणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत आगामी आर्थिक वर्षात पूर्ण झालेल्या तथापि, अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध नसलेल्या कामांसाठी आकस्मिकता निधीतून तरतूद उपलब्ध करून देता येणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी व त्यानुसार भांडवली खर्चाचे प्रस्ताव सादर करावेत.

(vii) विविध विभाग / खाते यांना संगणक / प्रिंटर इत्यादी बाबी खरेदी करण्यासाठी माहिती व तंत्रज्ञान खात्यांतर्गत एकत्रित तरतूद करण्यात येत होती. तथापि, सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पीय वर्षापासून माहिती व तंत्रज्ञान खात्यांतर्गत एकत्रित तरतूद करण्यात येत नाही. त्यामुळे ज्या खात्यांना आगामी वर्षात संगणक, प्रिंटर, प्रोजेक्टर, फॅक्स इत्यादीबाबींची खरेदी करावयाची असेल तर त्याकरीता सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजुरीने भांडवली कामाच्या संबंधित लेखा शिर्षांतर्गत तरतूद प्रस्ताविण्याची दक्षता घेण्यात यावी.

(viii) जंगम मालमत्ता (Moveable Assets) खरेदीसाठी उदा. फॅक्स मशिन, फर्निचर, यंत्रे व संयंत्रे, वाहने इत्यादींच्या खरेदीसाठी सादर करावयाच्या प्रस्तावात अंतर्भूत करावयाच्या कामांसाठी ४ या सिरीजने सुरु होणारे स्वतंत्र ९ अंकी लेखा संकेतांक (G.L. Code) देण्यात आले आहेत. तथापि, सदर स्वतंत्र लेखाशिर्षात तरतूद न प्रस्ताविता संबंधित बाबीच्या ४ सिरीज अंतर्गत मुख्य लेखाशिर्षात उदा.- (१) सर्व प्रकारचे फर्निचर व विद्युत उपकरणे (कॅबिनेट्स कपाटे, खुर्च्या, टेबल्स, गाद्या / खाट, ट्रॉली, रायटींग बोर्ड, लॉकर्स, इतर फर्निचर आणि फिक्चर्स, पंखे, विद्युत उपकरणे इत्यादी तत्सम बाबींकरीता) लेखा संकेतांक - ४१०७००००, उदा.- (२) कार्यालय आणि इतर साधनसामग्रीकरीता (संगणक, प्रिंटर्स, पेरिफेरल्स, प्रशितने, वॉटर प्युरिफायर इत्यादी तत्सम बाबींकरीता) लेखा संकेतांक - ४१०६०००० इ. अंतर्गत तरतुदी प्रस्ताविण्यात याव्यात. संबंधित खात्यानी ज्या बाबींची खरेदी करावयाची आहे ती बाब ४ सिरीज अंतर्गत कोणत्या मुख्य लेखाशिर्षात समाविष्ट आहे. याबाबत प्र.ले. (वित्त) खात्याच्या लेखा अधिकारी एफएआर / अर्थसंकल्प उपविभागाशी संपर्क साधून खातरजमा करुन तरतूदी प्रस्तावण्यात याव्यात.

(ix) विविध खात्यांमार्फत यंत्रसामग्री यांच्या खरेदीसाठी करण्यात येणाऱ्या तरतुदींच्या अनुषंगाने असे निदर्शनास येते की, यंत्रे व संयत्रे यांच्या खरेदीसाठी प्रथमत: अर्थसंकल्पीय तरतूदी करण्यात येतात व प्रतिवर्षी १ एप्रिलनंतर त्या यंत्राचे तपशील (Specifications) अंतिम करण्यात येतात. त्यामुळे बहुतांशवेळी ज्या बाबींसाठी अर्थसंकल्पीय अंदाजात तरतूदी करण्यात येतात, त्या खरेदी न करता त्याऐवजी इतर यंत्र सामग्रीची खरेदी सदर तरतुदीमधून करण्यात येते.

तसेच काही खात्याच्या बाबतीत उदा. प्रमुख अग्निशमन अधिकारी, रुग्णालये, इत्यादींच्या बाबतीत अर्थसंकल्पीय तरतूद प्रस्ताविण्यापूर्वी यंत्राचे तपशील (Specifications) अंतिम झालेले नसतात तसेच सदर यंत्रसामग्रीची खरेदीची प्रक्रिया दीर्घकालीन असल्यामुळे सर्व प्रक्रिया पार पाडून, यंत्रसामग्रीच्या

खरेदीसाठी कार्यादेश देण्यास विलंब होतो. त्यामुळे चालू आर्थिक वर्षात संबंधित लेखाशिर्षामध्ये खर्चाचे दायित्व नोंद होते. तथापि, त्याच आर्थिक वर्षात सदर यंत्राची प्रत्यक्ष प्राप्ती (Delivery) न होता बहुतांशवेळी आगामी आर्थिक वर्षात सदर यंत्रसामग्री प्राप्त होते. मात्र, त्या वर्षात संबंधित लेखाशिर्षात आर्थिक तरतूद उपलब्ध नसल्यामुळे सदर यंत्रसामग्रीच्या खरेदीचे अधिदान करण्यास अडचण निर्माण होते. तसेच काही बाबतीत यंत्रसामुग्री परदेशातुन आयात केल्या जातात व त्याकरीता L.C. (Letter of Credit) द्वारे अधिदान होते. अशा वेळेस बँकेचे Advise मागवून वेळोवेळी सॅप प्रणालीमध्ये (Miro/Migo/ Service Entry sheet) पदस्थापित करणे आवश्यक आहे. सदर खर्च सॅप प्रणालीमध्ये त्याच आर्थिक वर्षात पदस्थापित करताना आवश्यक तो निधी उपलब्ध नसल्याने संबंधित लेखाशिर्षात निधी स्थानांतरणाद्वारे/आकस्मिकता निधीतून तरतूद उपलब्ध करून द्यावी लागते, म्हणजेच एका यंत्रसामग्रीच्या खरेदीसाठी दोन वेळा अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध करून देणे भाग पडते. ही बाब अर्थसंकल्पीय शिस्तीच्या दृष्टीकोनातून योग्य नाही. त्यामुळे याबाबतीत सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीकोनातून आगामी अर्थसंकल्पीय वर्षात यंत्रसामग्रीच्या खरेदीकरीता तरतूद करण्यासाठी पुढील कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

अ) आगामी आर्थिक वर्षात खरेदी करावयाच्या यंत्र सामग्रीचे तपशील (Specifications) तयार करून प्रचलित पध्दतीनुसार सदर तपशील (Specifications) अंतिम करण्यात यावेत.

ब) सदरचे तपशील (Specifications) अंतिम करताना निविदा मागविल्यानंतर त्यास कमीतकमी ४ ते ५ प्रतिसाद प्राप्त होतील अशा पध्दतीने ते तयार करण्यात यावेत.

क) गेल्या दोन-तीन वर्षामध्ये सदर यंत्रसामग्री कोणत्या किंमतीने खरेदी करण्यात आली याचा तसेच सध्याचा बाजारभाव व इतर खात्यांनी देखील सदर यंत्राची खरेदी केली असल्यास त्यांच्या किंमतीबाबतचा विचार करून यंत्रसामग्रीची अंदाजित किंमत ठरविण्यात यावी.

उपरोक्त 'अ' ते 'क' स्थित बाबी नमूद करून अर्थसंकल्पीय तरतूद करण्याकरीता संबंधित मान.अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त यांची मंजुरी प्राप्त करावी व सदर मंजुरीच्या अनुषंगाने अर्थसंकल्पीय तरतूद करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात यावा.

(x) सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात ५ सिरीजखाली प्रकल्प कामांसाठी करण्यात आलेल्या तरतुदीपैकी काही तरतूद ४ सिरीज खाली वर्ग करणे आवश्यक झाल्यास, सन २०२३-२४ चे सुधारित अंदाज सादर करताना ५ सिरीजमधील अशा प्रकल्प कामांची उर्वरित तरतूद तसेच ४ सिरीज खाली वर्ग केलेली तरतूद विचारात घ्यावी.

(xi) सन २०१७-१८ या आर्थिक वर्षापासून विकास आराखडयाशी सुसंगत (Convergence) अर्थसंकल्पीय अंदाज तयार करण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने क्र.सीए/एफडीटी/२१ दि.३०.११.२०१६ अन्वये प्रसृत केलेल्या परिपत्रकातील मार्गदर्शक सूचनांन्वये प्रस्तावित विकास आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेला निधी विशेषत्वाने उपलब्ध करून देण्याची कार्यवाही सन २०१७-१८ या आर्थिक वर्षापासून सुरू करण्यात आली आहे.

सन २०२४-२५ मध्ये देखील विकास आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध करून द्यावयाचा असल्याने क्र.सीए/एफडीटी/२१ दि.३०.११.२०१६ अन्वये प्रसृत

केलेल्या मार्गदर्शक सूचना संदर्भित कराव्यात. त्यानुसार महानगरपालिकेच्या रिक्त जागांवरील आरक्षणांचा विकास करण्याच्या दृष्टीने संबंधीत खात्यांनी सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात तरतूदी प्रस्ताविणे आवश्यक आहे. विकास आराखड्याच्या अंमलबजावणीचा मागोवा ठेवण्याच्या दृष्टीने असे ठरविण्यात आले आहे की, प्रत्येक खात्याने त्यांचे अर्थसंकल्पीय अंदाज दोन भागांमध्ये उदा. भांडवली खर्च (CAPEX) व बिगर भांडवली खर्च (NON CAPEX) तयार करावेत. भांडवली खर्चामध्ये समाविष्ट करावयाच्या बाबींमध्ये विकास आराखड्यात असलेल्या आरक्षणानुसार महानगरपालिका मालमत्ता (Municipal Assets) तयार होतील अशा नवीन विकास कामांसाठी तरतूद प्रस्ताविण्यात यावी. बिगर भांडवली खर्चामध्ये (NON CAPEX) दुरुस्त्या, परिरक्षण, पुनर्विकास, अंतर्गत सजावटी इत्यादी करीता तरतूदी प्रस्ताविण्यात याव्यात.

सर्व खात्यांनी सन २०२४-२५ चे अर्थसंकल्पीय अंदाज प्रस्ताविताना उपरोक्त नमूद पध्दतीनेच अर्थसंकल्पीय अंदाज तयार करावेत. कार्य करणारी खाती व विकास आराखडयातील आरक्षणानुसार संभाव्य नवीन विकास कामे यांची यादी या परिपत्रकासमवेत D.P. Annexure - A मध्ये जोडण्यात आली आहे. विकास आराखडयातील आरक्षणाच्या प्रस्तावित विकासाबाबत मागोवा घेण्यासाठी भांडवली खर्चामध्ये (CAPEX) प्रस्तावित केलेल्या नवीन कामांची यादी परिपत्रकासोबत जोडलेल्या D.P. Annexure - B प्रपत्रात भरुन देणे आवश्यक आहे व त्यांची एक प्रत प्रमुख अभियंता (विकास नियोजन) यांच्याकडे सादर करणे आवश्यक आहे.

(xii) अर्थसंकल्पात समाविष्ट करावयाच्या नवीन प्रकल्प/कामांची एकूण अंदाजित किंमत प्रस्तावांमध्ये नमूद करणे तसेच अशा नवीन प्रस्तावांना संबंधित मान.उप आयुक्त व मान.अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त यांची प्रशासकीय मंजुरी प्राप्त करून सदर मंजूरी क्रमांक व दिनांक प्रस्तावामध्ये नमूद करणे आवश्यक आहे.

(xiii) १५ व्या वित्त आयोगाकडून प्राप्त झालेल्या अनुदानाच्या अनुषंगाने जी कामे हाती घेण्यात आली आहेत त्या कामांचा तक्ता त्याच्या संपूर्ण तपशिलासहीत कृपया सोबत जोडण्यात यावा. तसेच या कामांकरीता सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये स्वतंत्र तरतूद प्रस्ताविण्यात येणार नाही याची दक्षता संबंधित खाते प्रमुखांनी घ्यावी जेणेकरुन अश्या कामांची द्विरुक्ती होणार नाही.

(xiv) **भांडवली अर्थसंकल्पांतर्गत करण्यात आलेल्या ठोक तरतूदीमधून नवीन कामे हाती घेऊन मोठ्या प्रमाणात दायित्व निर्माण करण्यास प्रतिबंध घालण्याकरीता पुढीलप्रमाणे तरतूदी प्रस्ताविणे आवश्यक आहे.**

**सन २०२३-२४ या आर्थिक वर्षापासून ठोक तरतूदीकरीता ----**

**१) दिनांक ३१.०३.२०२३ रोजी किंवा त्यापूर्वी निविदा मागविल्या आहेत याकरिता तरतूद,**

**२) दिनांक ३१.०३.२०२३ नंतर मागविलेल्या निविदांकरिता तरतूद**

**अशी दोन लेखाशिर्षे तयार करण्यात आलेली आहेत. त्यामुळे संबंधित खात्याने कामाच्या स्थितीनुसार व आवश्यकतेनुसार सदर लेखाशिर्षामध्ये तरतूद प्रस्ताविणे आवश्यक आहे.** ***तसेच ज्या कामांकरीता दि.३१.०३.२०२४ नंतर निविदा मागविण्यात येणार आहेत अशा कामांकरीता नविन लेखाशिर्षा अंतर्गत स्वतंत्र तरतूद प्रस्ताविणे आवश्यक आहे.***

५.	सन २०२३-२४ चे सुधारित अंदाज व २०२४-२५ चे अर्थसंकल्पीय अंदाजाचे प्रस्ताव सादर करण्याचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे :-

(i)	परिपत्रक क्र.प्रले/एफडीटी/३४ दि.१७.८.२००० मधील परिच्छेद क्र.२, ३, ४ च्या धर्तीवर महसुली खर्चाचे आस्थापना, प्रशासकीय खर्च, व्याज व वित्त आकार महसुली अनुदाने, अंशदाने आणि सवलती इत्यादी लेखाशीर्षाबाबतचे तसेच भांडवली (प्रकल्प) खर्चाचे प्रभाग समितीच्या कक्षेत न येणारे सर्व प्रस्ताव त्याचप्रमाणे महसुली उत्पन्न / भांडवली उत्पन्नाचे आणि आगाऊ रकमा व अनिश्चित लेखा सेवाशीर्षासंबंधीचे सर्व प्रस्ताव संबंधित सहाय्यक आयुक्त/खाते प्रमुख यांनी प्रमुख लेखापाल (वित्त) यांच्या कार्यालयाकडे सादर करावयाचा अंतिम दिनांक ... ... ... **६ ऑक्टोबर, २०२३**

(ii)	मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मधील कलम ५० टीटी (७) (ब) नुसार सर्व सहाय्यक आयुक्त/खाते प्रमुख यांनी त्यांच्या विभागाचे/खात्याचे प्रस्ताव प्रभाग समिती अस्तित्वात असल्यास त्यांच्या शिफारशींसाठी संबंधित विभागाच्या सहाय्यक आयुक्तांकडे सादर करण्याचा अंतिम दिनांक ... ... **६ ऑक्टोबर, २०२३**

(iii)	संबंधित सहाय्यक आयुक्त यांनी प्रभाग समिती अस्तित्वात असल्यास त्यांच्या कार्यक्रमपत्रिकेवर विषय आणून प्रस्तावांवर त्यांच्या शिफारशी प्राप्त करुन/ प्रभाग समिती अस्तित्वात नसल्यास संबंधित उप आयुक्त यांच्या शिफारशी प्राप्त करुन खाते प्रमुखांकडे अभिप्रायांसाठी पाठविण्याचा अंतिम दिनांक ... ... **१० ऑक्टोबर, २०२३**

(iv)	प्रभाग समिती अस्तित्वात असल्यास संबंधित सहाय्यक आयुक्त/खाते प्रमुख यांनी शिफारस प्राप्त प्रस्ताव त्यांच्या अभिप्रायासह/प्रभाग समिती अस्तित्वात नसल्यास संबंधित उप आयुक्त यांचे शिफारस प्राप्त प्रस्ताव प्रमुख लेखापाल (वित्त) यांच्या कार्यालयाकडे सादर करावयाचा अंतिम दिनांक ... ... ... **१३ ऑक्टोबर, २०२३**

६.	**उपरोक्त परिच्छेद ५ (ii) मध्ये नमूद केल्यानुसार प्रभाग समिती अस्तित्वात असल्यास त्यांच्या शिफारशींसाठी सादर करावयाचे प्रस्ताव संबंधित विभागाच्या सहाय्यक आयुक्तांकडे दिनांक ६ ऑक्टोबर, २०२३ पर्यंत सादर करावेत व त्याचवेळी त्याची एक प्रत प्रमुख लेखापाल (वित्त) खात्याच्या अर्थसंकल्प उपविभागाकडे सादर करावी. अन्यथा, प्रभाग समिती अस्तित्वात नसल्यास सदर प्रस्ताव प्रमुख लेखापाल (वित्त) खात्यातील अर्थसंकल्प उपविभागाकडे संबंधित उप आयुक्त यांच्या शिफारशीसह पाठविण्यात यावेत.**

७.	**सर्व सहाय्यक आयुक्त/खाते प्रमुख यांना असे सूचित करण्यात येते की, सन २०२३-२४ या वर्षाचे सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाज हे माहे ३१ डिसेंबर पर्यंत अंतिम करण्यात येणार आहेत, जेणेकरुन संबंधित खात्यांना सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये उपलब्ध केलेल्या तरतूदीचा चालू वर्षाकरीता म्हणजेच जानेवारी ते मार्च या पुढील तीन महिन्यांमध्ये योग्य विनियोग करण्यासाठी पुरेसा अवधी मिळेल. तसेच वर्षाअखेरीस संबंधित खाते/विभाग कार्यालयांकडून निधी पुनर्वाटप/निधी स्थानांतरण/अतिरिक्त निधी करीता मोठ्या प्रमाणात प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांची संख्या देखील खुप कमी होण्यास मदत होईल.**

८.	**उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन प्रभाग समितीच्या कार्यकक्षेत येणारे व प्रभाग समितीच्या कार्यकक्षेत न येणारे प्रस्ताव उपरोक्त परिच्छेद ५ व ६ मध्ये अगोदरच नमूद केलेल्या दिनांकास परिपूर्ण प्रस्ताव प्रमुख लेखापाल (वित्त) खात्याच्या अर्थसंकल्प उपविभागाकडे सादर करावयाचे आहेत.**

**प्रस्तुत दिनांकापर्यंत प्रस्ताव प्राप्त न झाल्यास त्या खात्याचा कोणत्याही प्रकारचा प्रस्ताव चालू/आगामी वर्षाच्या अर्थसंकल्पात समाविष्ट करावयाचा नाही असे गृहित धरण्यात येऊन पुढील कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.**

९. सर्व संबंधित सहाय्यक आयुक्त / खाते प्रमुख यांनी त्यांच्या विभागाच्या / खात्याच्या अर्थसंकल्पीय प्रस्तावासोबत सदर प्रस्तावाची सॉफ्ट कॉपीही (Pen Drive मध्ये) सादर करावी.

१०. विविध खात्यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पीय प्रस्तावांबाबत बऱ्याचदा काही स्पष्टीकरण / अतिरिक्त माहिती आवश्यक असते तसेच प्रस्तावात काही बदल / दुरुस्त्या करणे आवश्यक असते किंवा प्रस्तावाशी संबंधित मंजुरीची कागदपत्रे प्राप्त करणेही आवश्यक असते. त्याचप्रमाणे अर्थसंकल्पीय बैठकांच्या वेळापत्रकाबाबत माहिती देण्यासाठीही संबंधित कर्मचाऱ्यांशी तात्काळ संपर्क साधणे आवश्यक ठरते. अतएव, सर्व संबंधित सहाय्यक आयुक्त / खाते प्रमुख यांनी त्यांच्या विभागाच्या / खात्याच्या अर्थसंकल्पीय प्रस्तावात, प्रस्ताव तयार करणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्यांची नावे व त्यांचे थेट तथा विस्तारित दूरध्वनी क्रमांक, मोबाईल क्रमांक, फॅक्स क्र. व ई-मेल आयडी नमूद करण्याची दक्षता घ्यावी.

११. सर्व संबंधित सहाय्यक आयुक्त / खाते प्रमुख यांनी त्यांच्या विभागाच्या / खात्याच्या अर्थसंकल्पीय प्रस्तावांची परिपुर्ण माहिती, नवीन कार्यप्रणालीनुसार प्रस्तावात भरताना सदर परिपत्रकातील सूचनांचे तसेच वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

१२. वरील बाबतीत कोणत्याही प्रकारची अडचण असल्यास संबंधितांनी प्रमुख लेखापाल (वित्त) खात्याच्या अर्थसंकल्प उपविभागाशी संपर्क साधावा.

| | | |
|---|---|---|
| सही/-११.०९.२०२३ | सही/- १२.०९.२०२३ | सही/- १३.०९.२०२३ |
| (प्रदिप भा. पडवळ) | (प्रशांत गायकवाड) | (पी. वेलरासू) |
| **प्रमुख लेखापाल (वित्त) प्र.** | **उप आयुक्त (वित्त)प्र.** | **अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प)** |

---

**परिपत्रक**

**२०२३-२०२४**

क्रमांक : प्रले/एफडीटी/०८ दि.१४.०९.२०२३

-----------------------------------------------यांना प्रत (------------जादा प्रतींसह) माहितीसाठी व योग्य कार्यवाहीसाठी पाठविली आहे.

१४/०९/२०२३

(श्यामसुंदर शिर्सेकर)

**प्रमुख लेखापाल (वित्त) यांजकरिता**

*Annexure - A*

**Budget Estimation sheets of Revenue Income of ______________________________ Department for the year 2024-25**

**Department Code** [ ] **Linked Geographic Area Code** [ ]

**Cost Centre Name** [ ] **Linked Geographic Area Name** [ ]

*(Rs. in thousands)*

| Fund Code | Cost Centre Code | Function Code | Function Name | Account Code | Account Head | Actuals 2020-21 | Actuals 2021-22 | Actuals 2022-23 | Budget Estimates 2023-24 | Actuals for the first six month of 2023-24 | Revised Estimates 2023-24 | Explanation for Increase or Decrease of Col.12 Over Col.no.10 | Budget Estimates 2024-25 as per existing rate | Budget Estimates 2024-25 as per Proposed Revision, New Taxes/ Fees etc. | Explanation for Increase or Decrease of Col.14 Over Col.no.12 | Brief Information pertaining to Proposed Revision, New Taxes/ Fees with reference to Col.No.15 | Date of last Revision (Please refer point no.3 (iii) from budget circular) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | Total | | | | | | | | | | | | |

*Annexure - B - I*

